# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:08.05.2026** **वारः शुक्रवार**

---

1. ऑपरेशन सिंदूरच्या वर्षपूर्तीनिमित्त भारतीय सैन्याचा अतुलनीय पराक्रम आणि धैर्याचं देशभरातून कौतुक.
2. मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी सामंजस्य करार.
3. विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश.
4. इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर होणार.
5. आकाशवाणीच्या नव्वदीनिमित्त पुणे केंद्रातर्फे पदफेरीचं आयोजन आणि
6. राज्यात काही भागांना पावसाचा तडाखा, आजही जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा.

**ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूरला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं काल देशभरातून भारतीय सैन्य दलांच्या पराक्रमाचा गौरव करण्यात आला. पहलगाममधल्या दुर्दैवी हल्ल्याला भारतीय सैन्यानं योग्य प्रत्युत्तर दिलं असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. भारताची शांतता, एकता आणि सार्वभौमत्वतेला विस्कळीत करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैन्यदलांनी जोरदार आणि योग्य प्रत्युत्तर दिल्याचं उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अतुलनीय कामगिरीबद्दल संपूर्ण देश भारतीय सैन्याला अभिवादन करत असल्याचं सांगून या कामगिरीतून भारतीय सैन्याची व्यवसाय-कुशलता, तयारी आणि समन्वय दिसून येतो असं समाजमाध्यमांवरील आपल्या संदेशात सांगितलं. पाकिस्तानातही दहशतवाद्यांचे अड्डे सुरक्षित नाहीत हे ऑपरेशन सिंदूरमधून स्पष्ट झालं आणि ही फक्त सुरुवात होती अशी प्रतिक्रिया भारतीय लष्करानं ऑपरेशन सिंदूरच्या वर्षपूर्तीच्या निमित्तानं दिली आहे.

**व्हिएतनाम**

व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी मुंबईत, काल नॅशनल स्टॉक एक्सचेंज मुख्यालयाला शिष्टमंडळासह भेट देत, प्रतिकात्मक घंटा वादनही केलं. यावेळी त्यांनी एनएसईच्या कामकाजाची तसंच भारतीय वित्तीय व्यवस्थेची माहिती घेतली. भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करण्याच्या उद्देशान काल मुंबईत एका गोलमेज परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं; या परिषदेत बोलताना अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी, महाराष्ट्रात गुंतवणूक करणाऱ्या व्हिएतनामच्या कंपन्यांसाठी, समर्पित पायाभूत सुविधा, विशेष आयटी पार्क्स आणि प्रगत डेटा सेंटर परिसंस्था विकसित करण्यास महाराष्ट्र राज्य उत्सुक असल्याचं सांगितलं.

**वॉटर-मेट्रो**

मुंबई वॉटर मेट्रो प्रकल्पासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि नॉर्वेस्थित हायके ए एस या सागरी तंत्रज्ञान कंपनीदरम्यान सामंजस्य करार मुंबईत काल करण्यात आला. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गेल्या दहा वर्षांपासून शाश्वत जलवाहतुकीच्या संकल्पनेवर राज्य शासनाचं सातत्यानं काम सुरू आहे. मुंबईत जलवाहतुकीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचा संपूर्ण आराखडा आता तयार झाला असून, त्यासाठी आधुनिक आणि शाश्वत नौकांची आवश्यकता होती. मुंबईत सुरू होत असलेली ही संकल्पना देशातील इतर शहरांसाठीही मार्गदर्शक ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**कुंभ उद्योग-नाशिक**

देशातील पहिले ट्रायबल इंडस्ट्री क्लस्टर दिंडोरी तालुक्यातील जांबुटके इथं आकाराला येणार असून त्यासाठी आवश्यक जमिनीचे हस्तांतरण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे करण्यात आले. कुंभ

उद्योग संगम आणि नाशिक जिल्हा गुंतवणूक समीटमध्ये काल हे जमीन हस्तांतरण करण्यात आल. यावेळी विविध सामंजस्य करार करण्यात आले.

**<u>पाटील-मसं</u>**

विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी प्रशासनाला दिले आहेत. मुंबईतल्या वांद्रे, इथल्या डॉक्टर बळीराम हिरे महाविद्यालयातील, 132 हून अधिक विद्यार्थ्यांना बोगस अभ्यासक्रम आणि पदव्या दिल्याच्या पार्श्वभूमीवर, ते बोलत होते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचं संरक्षण करणं ही सर्वोच्च प्राथमिकता असून विद्यार्थ्यांची फसवणूक आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान खपवून घेतलं जाणार नाही असं पाटील यांनी सांगितल.

**<u>दहावी निकाल</u>**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीनं घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त  प्रमाणपत्र, अर्थात दहावीच्या परीक्षेचा निकल आज दुपारी एक वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येणार आहे. फेब्रुवारी-मार्च महिन्यात झालेल्या या परीक्षेचा निकाल, विद्यार्थ्यांना विषयानुसार मिळालेल्या गुणांसह मंडळाच्या संकेतस्थळांवर पाहता येणार असून शाळांना देखील एकत्रित स्वरूपात मिळणार आहे.

**<u>थॅलेसेमिया दिवस</u>**

आंतरराष्ट्रीय थॅलेसेमिया दिवस म्हणून आठ मे हा दिवस ओळखला जातो. थॅलेसेमिया या अनुवंशिक रक्त विकाराबद्दल जागरूकता वाढवणे, रुग्णांना आधार देणे यासाठी काम करणे हे या दिवसाच मुख्य उद्दिष्ट आहे. जनकल्याण रक्त पेढीच्या जिल्हा समन्वयक मानसी ठाकूर यांनी या दिनानिमित्त आकाशवाणीला माहिती देताना सांगितलं.....

**थेलेसेमिया चे निदान न झालेल्यांचा शोध दुर्लक्षितांना आधार ही या वर्षीची थीम आहे. आणि या थीम अंतर्गत थेलेसेमिया आजाराचे जे वाहक आहेत त्यांचा शोध घेणे, त्यांना मार्गदर्शन करणे हे काम जनकल्याण रक्तपेढीने हाती घेतलेलं आहे. महाराष्ट्रातल्या एकूण चौदा जिल्ह्यांमध्ये जनजागृती आणि तपासणी कार्यक्रम जनकल्याण आणि सहयोगी संस्था यांच्यामार्फत होत आहेत. जे लग्नाला इच्छुक आहेत. आणि ज्यांचं लग्न झालं आहे त्यांनी गर्भधारणेपूर्वी थेलेसेमिया ची तपासणी करून घ्यावी आणि पुढची पिढी सुरक्षित करावी. लक्षात घ्या, हा आजार आनुवंशिक आहे. माहिती हीच त्याच्यावरची उपाययोजना आहे आणि लग्नाआधी छोटी तपासणी उद्याची सुरक्षित पिढी तयार होण्याचा मार्ग आहे.**

**<u>पदफेरी</u>**

आकाशवाणीच्या नव्वद वर्षपूर्तीनिमित्त आकाशवाणी पुणे केंद्रातर्फे आता सकाळी केंद्र कार्यालयापासून शनिवारवाड्यापर्यंत पदफेरीचं आयोजन करण्यात आलं आहे. 'चला, वारसा आणि आरोग्य यांचा मेळ घालू या' अशी यामागील संकल्पना आहे. यामध्ये केंद्रातील विविध विभागांचे स्थायी आणि अस्थायी कर्मचारी सहभागी झाले आहेत. पदफेरी पुन्हा कार्यालयात येऊन समाप्त होणार आहे.

**<u>भूसंपादन</u>**

बीड जिल्ह्यात दाखल असलेल्या कथित भूसंपादन मावेजा घोटाळ्याच्या तपासात बीड पोलिसांनी लातूरमधून तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक केली आहे. 2023 मधील या प्रकरणात विविध कलमांसह भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**<u>टीसीएस-नाशिक</u>**

नाशिकच्या टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रयत्न प्रकरणातील फरार आरोपी निदा खान हिला छत्रपती संभाजीनगरमधून काल संध्याकाळी अटक करण्यात आली. सक्तीनं धर्मांतर केल्याप्रकरणी तिच्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर ती फरार झाली होती. अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतरही ती सापडत नव्हती. महिनाभर पोलिसांना तिनं हुलकावणी दिली.

**<u>अपघात-रायगड</u>**

रायगड जिल्ह्यात माणगाव इथ झालेल्या भीषण रस्ता अपघातात, तीन जण जागीच ठार झाले. बाजारपेठेत भरधाव टेम्पोच्या चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळं त्यानं पादचाऱ्यांना धडक दिली. मृतांमध्ये रस्त्यावर चालत असलेल्या पती-पत्नीचा समावेश आहे. टेम्पोचालक फरार झाला आहे.अपघातात काही दुकानदारांचंही नुकसान झाल आहे.

**जलतारा-धाराशिव**

धाराशिव जिल्हा प्रशासनानं जलसंधारणासाठी मोठी मोहीम हाती घेतली आहे. यासाठी जिल्हाभरात एक लाख 'जलतारा' कामं पूर्ण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कीर्ती पुजार यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट आणि सामाजिक संस्थांची काल झालेल्या बैठकीत या मोहिमेवर चर्चा करण्यात आली.

**अवकाळी-यवतमाळ**

राज्याच्या विविध भागांमध्ये काल जोराचे वारे आणि वीजांसह पावसानं तडाखा दिला. यवतमाळ इथं कडक ऊन्हामुळं वातावरण तापलेलं असताना अचानक बदल होऊन सोसायट्याचा वारा आणि विजांसह मुसळधार पाऊस पडला. अचानक झालेल्या या पावसामुळं नागरिकांची धावपळ झाली. वादळी वाऱ्यामुळं उन्हाळी मूग, तीळ आणि ज्वारी पिकाचं मोठं नुकसान झालं असून झाडांना लगडलेले आंबेदेखील मोठ्या प्रमाणात खाली पडले. एकीकडे उन्हाच्या झळांनी नागरिक घामाघूम होत असताना अचानक आलेल्या पावसामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला.

**पाऊस**

रत्नागिरीच्या संगमेश्वर आणि लांजा तालुक्यात काल संध्याकाळी पावसाचा जोरदार तडाखा बसला. संगमेश्वर तालुक्यातल्या देवरूख परिसरात विजा आणि वादळी वाऱ्यांसह तासभर झालेल्या पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं. आंबा पिकाचं या पावसामुळे मोठं नुकसान झालं. खंडित झालेला वीजपुरवठा रात्री उशिरापर्यंत सुरू झालेला नव्हता.
सांगली जिल्ह्यातील मिरज, वाळवा आणि शिराळा तालुक्यात काल पाऊस पडला. सांगलीत सायंकाळी आलेल्या पावसामुळं भाजीपाला विक्रेते आणि नागरिकांची तारांबळ उडाली.
सातारा जिल्ह्यातील कोरेगाव आणि पाटण तालुक्यातील काही भागात काल दुपारनंतर पावसानं हजेरी लावली.

**तापाऊस-सोलापूर**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील तापमानामध्ये कमालीची घट झाली. काल दिवसभरात ४० अंश सेल्सियसच्या वर तापमानाची नोंद झाली होती. मात्र सायंकाळी साडेपाचनंतर शहरातील अनेक भागात हलक्या आणि तुरळक पावसाला सुरुवात झाली. त्यामुळं उन्हानं त्रस्त झालेल्या सोलापूरकरांना काही अंशी दिलासा मिळाला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये आज जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.